
UGC Approved Sr. No. 49366

SRJIS

Online ISSN -2278-8808
Printed ISSN- 2349-4766

GLOBALLY INDEXED
IMPACT FACTOR SJIF 2016 6.177






An International Peer Reviewed

Referred Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

OCT-DEC , 2017. VOL. 6, ISSUE -34

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

5

*प्रा. संदेश सदाशिव तावडे & प्रा.डॉ. पंकज त्र्यंबक निकम (1291-1294)*

# मानव विकास निर्देशांकाबाबत भारतातील सद्य:स्थिती

**प्रा. संदेश सदाशिव तावडे & प्रा.डॉ. पंकज त्र्यंबक निकम**

*वाणिज्य विभाग प्रमुख, म.वि.प्र.समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मनमाड, ता. नांदगाव, जि. नाशिक (महाराष्ट्र)*

*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, म.वि.प्र. समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मनमाड, ता. नांदगाव, जि. नाशिक (महाराष्ट्र)*

**प्रस्तावना :**जागतिक मानव विकास निर्देशांक अहवाल म्हणजे जगातील प्रत्येक देशासाठी स्वत:ला
आरशात न्याहाळून घेण्याची एक संधी असते. देशाची स्थिती काय आहे ते समजून घेणे शक्य
होते. देशहिताच्या दृष्टीने अग्रक्रमाने कोणती पावले उचलायला हवीत हेही कळते. मानव
विकासाच्या आघाडीवर भारताची जी वाटचाल सुरु आहे, ती कितपत समाधानकारक आहे? मानव
विकासविषयक नियोजन आणि परिणामकारक अंमलबजावणीसंदर्भात आपण पुरेसे गंभीर आहोत
का? यासारख्या प्रश्नांचे सिंहावलोकन करता येणे शक्य होते. कोणत्याही देशाचा विकास हा त्या
देशातील मानवाच्या विकासावर अवलंबून असतो. देशातील कृषिक्षेत्र, उद्योग क्षेत्र आणि सेवा
क्षेत्राची प्रभावी अंमलबजावणी त्या देशातील मानवी भांडवलावरुन निश्चित होते. मानवी भांडवल
किंवा मानवाचा विकास जितका जास्त झालेला असेल तितका तो देश आर्थिक सत्तेकडे, सुबत्तेकडे
झेप घेत असतो. मानवाचा विकास मोजण्याचा एक मापदंड म्हणजे मानव विकास निर्देशांक होय.
मानव विकास निर्देशांकाच्या कसोटीवर मागच्या तीन दशकात भारताचा सरासरी वार्षिक वृध्दीदर
कमालीचा निराशाजनक असून भारताची वाटचाल अतिशय संथ आहे. सन 2016 च्या
आकडेवारीनुसार 23 मार्च 2017 रोजी युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्रॅमने प्रसिद्ध केलेल्या
अहवालात भारताचा मानव विकास निर्देशांक 0.624 इतका असून जगातील 188 देशांमध्ये 131 वा
क्रमांक लागतो.

- **अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

1) 'मानव विकास निर्देशांक' ही संकल्पना अभ्यासणे.
2) मानव विकास निर्देशांक कसा मोजतात ते अभ्यासणे.
3) मानव विकास निर्देशांक अहवाल – 2016 च्या अहवालातील भारताच्या परिस्थितीचा
अभ्यास करणे.
4) मानवी विकासाची स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना मांडणे.

- **संशोधन पद्धती :** प्रस्तुत लघुशोध निबंध हा दुय्यम तथ्यांवर आधारित आहे. संदर्भ
ग्रंथ, मासिके, संशोधन पेपर, दैनिक वर्तमानपत्रे यांचा आधार घेण्यात आला आहे.

एखाद्या देशाचा विकास कितपत झालेला आहे, हे
- **मानव विकास निर्देशांक :** ठरविण्यासाठी 'मानव विकास निर्देशांक' ही मोजपद्धीचे कार्य करते. देशाचा विकास आर्थिक
वृद्धीपेक्षा अन्य अनेक पैलुंना स्पर्श करतो आणि विकास त्या देशातील मानवी संसाधनाच्या क्षमता
विकासावर अवलंबून असतो. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने 1990 सालापासून मानव विकास

निर्देशांक काढण्यासाठी एक नवी पद्धत स्विकारून मानव विकास निर्देशांक तयार केला आहे. मानवी विकासासंदर्भात शिक्षण, आरोग्य, प्रशिक्षण, मुलभूत निवड स्वातंत्र्ये इ. घटक विचारात घेवून मानवी विकासाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "लोकांना निवडीसाठी उपलब्ध असणाऱ्या पर्यायांमध्ये वाढ करण्याची आणि आपल्या कल्याणाची इष्टपातळी गाठण्याची विस्तृत सर्वसमावेशक व व्यापक प्रक्रिया म्हणजे मानवी विकास होय." भारताचे अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन आणि पाकिस्तानचे अर्थतज्ञ मेहबूब उल हक यांनी मानव विकास निर्देशांक विकसित केला. लोकांचे आरोग्य, लोकांचे ज्ञान आणि त्यांच्या राहणीमानाचा दर्जा या तीन पैलुंना शून्य ते एक या मूल्यादरम्यान प्रमाणित करण्यात येते व त्या तिघांची सरासरी काढून मानव विकास निर्देशांकाचे एकूण मूल्य शून्य ते एकाच्या दरम्यान निश्चित केले जाते.

- **मानव विकास निर्देशांक कसा मोजतात:** संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) या द्वारे प्रतिवर्षी जगातील देशांची चार गटात वर्गवारी केली जाते. ती अशी–

  1) अत्युच्च विकसित देश
  2) उच्च विकसित देश
  3) मध्यम विकसित देश
  4) अल्प विकसित देश

ही विभागणी मानव विकासावर आधारित असते. मानव विकास निर्देशांक प्रामुख्याने पुढील तीन पैलूवरून ठरविला जातो.

1) **लोकांचे आरोग्य :** मानवाचा विकास झाला म्हणजे त्याचे आरोग्य चांगले असले पाहिजे, सुधारले पाहिजे, पण आरोग्य सुधारले हे मोजायचे कसे? यासाठी आयुर्मान हा मोजमापाचा निकष ठरविण्यात आला. वाढते आयुर्मान हे विकासाचे द्योतक मानले जाते.

2) **लोकांचे ज्ञान :** विकासाचा निर्देशांक म्हणजे देशातील लोकांच्या ज्ञानात होणारी वाढ होय. ही ज्ञानातील वाढ मोजण्यासाठी वय वर्षे 15 व त्यावरील लोकांचा साक्षरता दर हा एक निकष आणि प्राथमिक व उच्च शिक्षणासाठी प्रवेशाचे प्रमाण हा दुसरा मापदंड त्यासाठी निश्चित करण्यात आला.

3) **लोकांच्या राहणीमानाचा दर्जा :** 'लोकांच्या राहणीमानाचा दर्जा त्यांच्या वस्तु व सेवा यांच्या उपभोगावर अवलंबून असतो. देशांतर्गत दरडोई स्थूल उत्पादन ही मोजपट्टी त्यासाठी वापरली जाते. अर्थात प्रत्येक देशातील किंमत पातळी भिन्न असल्याने दरडोई स्थूल उत्पादन क्रयशक्ती तुल्यतेवर आधारित ठरविले जाते.

वरील तीन बाबींसाठी समान महत्त्व देवून मानव विकास निर्देशांक काढला जातो. या तीन पैलुंना शून्य ते एक मूल्यादरम्यान प्रमाणित करण्यात येते व त्या तिघांची सरासरी काढून मानव विकास निर्देशांकाचे एकूण मूल्य शून्य ते एकाच्या दरम्यान निश्चित करतात. निर्देशांक एक असतो तर सर्वात जास्त म्हणजे चांगला निर्देशांक मानला जातो व देशांची क्रमवारी एक पासून शून्यापर्यंत गुणानुसार लावली जाते. थोडक्यात मानव विकासाच्या स्तरानुसार जगातील देशांचे क्रमांक ठरविण्यासाठी जो निर्देशांक वापरला जातो, त्यास मानव विकास निर्देशांक असे म्हणतात. हा निर्देशांक आयुर्मान, ज्ञान व शिक्षण आणि राहणीमानाचा दर्जा या तीन पैलुंना महत्त्व देवून निश्चित करतात. निर्देशांकानुसार देशांची वर्गवारी पुढीलप्रमाणे केली जाते.

| निर्देशांक | वर्गवारी |
|---|---|
| 0.9 ते 1 | अत्युच्च विकसित देश |
| 0.8 ते 0.9 | उच्च विकसित देश |
| 0.5 ते 0.8 | मध्यम विकसित देश |
| 0.5 पेक्षा कमी | अल्प विकसित देश |

निर्देशांक काढण्यासाठी आवश्यक ती माहिती व आकडेवारी विश्वासार्ह स्त्रोतापसून घेतली जाते. संयुक्त राष्ट्र संघाच्या लोकसंख्या विभागाकडून आयुर्मानाची, युनेस्को इन्स्टिट्युट फॉर स्टॅटीस्टीक्स कडून प्रौढ साक्षरता दर व शिक्षण नोंदणी प्रमाण यांची तर जागतिक बँकेकडून दरडोई ढोबळ देशांतर्गत उत्पादनाची माहिती व सांख्यिकी मिळविली जाते.

दि. 23 मार्च 2017 रोजी UNDP ने प्रकाशित केलेल्या अहवालात सन 2016 मधील आकडेवारी वरुन जगातील काही देशांच्या मानव विकास निर्देशांकाची स्थिती पुढीलप्रमाणे आहे

| मानव विकास निर्देशांक गुणानुक्रम | देश | मानव विकास निर्देशांक मुल्य | सरासरी आयुर्मान | शाळेतील वर्ष (सरासरी प्रमाण) | दरडोई स्थूल उत्पादन (अमेरिकन डॉलर) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | नॉर्वे | 0.949 | 81.7 | 12.7 | 67614 |
| 02 | ऑस्ट्रेलिया | 0.939 | 82.5 | 13.2 | 42822 |
| 03 | स्विझर्लंड | 0.939 | 83.1 | 13.4 | 56364 |
| 04 | जर्मनी | 0.926 | 81.1 | 13.2 | 45000 |
| 05 | डेन्मार्क | 0.925 | 80.4 | 12.7 | 44519 |
| 10 | युनायटेड स्टेटस | 0.920 | 79.2 | 13.2 | 53245 |
| 90 | चीन | 0.738 | 76.0 | 7.6 | 13345 |
| 131 | भारत | 0.624 | 68.3 | 6.3 | 5663 |
| 147 | पाकिस्थान | 0.550 | 66.4 | 5.1 | 5031 |
| | जग | 0.717 | 77.6 | 8.3 | 14447 |

संदर्भ : http://hrd.undp.org/sites

वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, नॉर्वे ह्या देशाचा मानव विकास निर्देशांक सर्वात जास्त असून त्यानंतर ऑस्ट्रेलिया, स्विझर्लंड या देशांचा आहे. भारताचा मानव विकास निर्देशांकाबाबत जगात 131 वा क्रमांक लागतो. तो 0.624 इतका असल्याने भारताचा समावेश मध्यम विकसित देशात केला जातो. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने सन 2016 मधील जगातील 188 देशांच्या माहितीवरुन वरील गुणानुक्रम निश्चित केले आहेत. मानव विकास निर्देशांकाबाबत भारतापुढे जवळपास 130 देश आहेत हेच वरील पत्रकावरुन लक्षात येते.

- **भारतीय मानवी विकासाची स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना** : भारताने अलिकडील काही काळामध्ये उद्योग आणि सेवा क्षेत्रामध्ये नेत्रदिपक कामगिरी केली आहे. सन 2020 पर्यंत भारत महासत्ता होईल असेही अनेक तज्ञांकडून सांगितले जात आहे, असे असूनही आपल्या देशात काही समस्याही प्रामुख्याने दिसून येतात. मानवी विकास हा आर्थिक विकासाचा महत्त्वपूर्ण पैलू बनल्याने त्यातून प्रवास करताना भारतातील सार्वजनिक सत्तेने पुढील उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

1) **शिक्षणावरील खर्चात वाढ** : सार्वजनिक सत्तेने शिक्षणाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी केल्या जाणाऱ्या खर्चात वाढ घडवून आणली पाहिजे. सरकारचा शिक्षणावरील खर्च फक्त 3 टक्केच्या जवळपास आहे. हा खर्च मुणगेकर समितीच्या व कोठारी आयोगाच्या केलेल्या शिफारशीनुसार स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या 6 ते 7 टक्के खर्च शिक्षणावर झाला पाहिजे असे सुचविण्यात आले आहे. त्यानुसार शिक्षणावरील खर्चात वाढ करणे गरजेचे आहे.

2) **पायाभूत व सामाजिक क्षेत्राकडे विशेष लक्ष** :भारत सरकारने देशातील पायाभूत व सामाजिक क्षेत्राच्या विकासासाठी विशेष तरतूद करुन या दोन्हीही क्षेत्रांचा विकास घडवून आणला पाहिजे.

3) **व्यावसायिक व तंत्रशिक्षणावर भर** :शिक्षणासंबंधी सर्व धोरणांची अंमलबजावणी करीत असतांना देशात व्यावसायिक व तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणाची विशेष पुरेशी गुंतवणूक करणे गरजेचे आहे.

4) **संशोधनास प्राधान्य** :देशातील सरकारने संशोधनास प्राधान्य दिले पाहिजे. तसेच संशोधनाची गुणवत्ता सुधारुन सामाजिक शास्त्रातील संशोधनाला चालना दिली पाहिजे आणि ते समाजास उपयोगी पडेल. त्यादृष्टीने दर्जा निर्माण होईल. याची दक्षता घेतली पाहिजे.

5) **आरोग्य विषयक आधुनिक सुविधा** :लोकांच्या आरोग्यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने देशातील आरोग्य क्षेत्राने आधुनिक सुविधांचा स्विकार करुन त्यांचा प्रचार व प्रसार केला पाहिजे. आरोग्य क्षेत्रास बळकट करण्यासाठी सरकारने सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहिजेत.वरील उपायांबरोबरच उत्पन्न वाटपातील विषमता कमी करणे, समानतेचे तंत्र, दारिद्र्य, स्त्री– पुरुष भेदभाव या सारखे मुद्दे शासनाने गंभीरपणे हाताळले पाहिजेत.

**समारोप** :भारतीय अर्थव्यवस्था प्रगतीकडे झेप घेत आहे, तसेच भारत आर्थिक महासत्तेकडे जात आहे, असे भारतातील अर्थतज्ज्ञ आणि सुधारणावाद्यांना वाटत आहे. परंतु असे असले तरीही भारताच्या विकासाबाबत पुरेसे आशादायी चित्र नाही. जागतिक पातळीवर भारताची मानवी विकासंदर्भातील स्थिती खुप गंभीर आहे. त्या स्थितीत सुधारणा होत आहे परंतु, पाहिजे त्या प्रमाणात गती नाही. म्हणून देशातील सार्वजनिक सत्तेला देशातील मानवाचा विकास घडवून आणणे आणि अत्युच्च विकसित देशांच्या रांगेत नेण्याची जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. मानव विकास निर्देशांकाच्या कसोटीवर मागच्या तीन दशकात भारताचा सरासरी वार्षिक वृद्धीदर कमालीचा निराशाजनक असून भारताची वाटचाल अतिशय संथ आहे. जोपर्यंत देशातील लोकांचे आरोग्य, राहणीमानाचा दर्जा आणि महत्त्वाचे म्हणजे लोकांचे ज्ञान व शिक्षणाचे प्रमाण याबाबत सरकारकडून सकारात्मक स्वरुपाचे बदल दिसून येणार नाही तोपर्यंत भारताच्या मानव विकास निर्देशांक मूल्यात वाढ होणार नाही, याबाबत सरकारने गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

**संदर्भ** :

1) *भारतातील आणि जागतिक आर्थिक विकास– मुकूंद महाजन*
2) *भारतातील अर्थव्यवस्था – रुदार दत्त, के.पी.एम. सुंदर*
3) *दैनिक लोकमतचे विविध लेख.*
4) *अर्थसंवाद त्रैमासिकाचे विविध अंक.*
5) *http://hrd.undp.org/sites*